# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष (DAY-NULM)

## जाहीर प्रकटन

संदर्भ : १) महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनिमयन) अधिनियम २०१४ (महाराष्ट्र नियम, २०१६)

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील तरतुदींची अंमलबजावणी करणेबाबत सोलापूर शहर पथ विक्रेता समिती गठीत करण्यासाठी पथ विक्रेता अधिनियम २०१४ मध्ये प्रकरण चारमध्ये ११ व १२ नुसार ११.२ (ख) इतर मंडळातील (दोन) ते (सहा) पाच प्रवर्गांतील सात सदस्य नामनिर्देशन मागणी करण्याकरिता खालील संवर्गातून इच्छुक संघटना, संघाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इतर मंडळे प्रवर्ग | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | अशासकीय संघटना (Non-Government Organization) आणि समुदाय आधारित संघटना (Community Based Organizations) | ०२ |
| २ | निवासी कल्याण संघ (Resident Welfare Associations) | ०२ |
| ३ | व्यापारी संघ (Representative of Traders Associations) | ०१ |
| ४ | पणन संघ (Representative of Market Associations) | ०१ |
| ५ | अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | ०१ |

**नगर पथ विक्रेता समितीच्या नामनिर्देशित सदस्यांसाठी किमान अर्हता :**

१) संघटनेची किंवा संघाची संबंधित क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंद केलेली असावी.

२) संघटना किंवा संघ, मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षण अहवाल सादर केलेले असावेत.

३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.

४) संघटना किंवा संघ त्या-त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाही.

५) संघटना किंवा संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असावा.

उपरोक्त अर्हता धारण करीत असलेल्या इच्छुक संघटना किंवा संघाकडून नगर पथ विक्रेता समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी दिनांक २४/१०/२०२४ पर्यंत आवश्यक त्या संबंधित कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

उपरोक्त संघटना किंवा संघ यांचेकडून निवड करावयाच्या सदस्य संख्येपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनिमयन) अधिनियम २०१४ (महाराष्ट्र) नियम, २०१६ अन्वये मा. आयुक्त तथा अध्यक्ष, नगर पथ विक्रेता समिती यांचा निर्णय अंतिम राहील.

नामनिर्देशन पत्राची प्रत व त्यासोबत जोडावयाची कागदपत्रे/दस्ता ऐवजाच्या तपशीलाबाबतची माहिती सोलापूर महानगरपालिका येथे कार्यालयीन वेळेत 3रा मजला DAY-NULM विभागात पाहण्यास मिळतील.

सही/-

**आयुक्त तथा अध्यक्ष**

**नगर पथविक्रेता समिती ,**

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**